ISSN 2249-4081
RNI MAHMUL 02935/2011

*National Registered and Recognized*
*Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL
## ECONOMIC RESEARCH

16-17

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Issue : XII, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
Oct. 2016 To Mar. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist Nanded

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Instruments of Monetary Policy in India | Dr. Prakash G. Kadrekar | 1 |
| 2 | Microfinance and women Improvement | Gajendra Wasnik | 7 |
| 3 | Customer Relationship Management : An overview | Hrishikesh R. Vipradas | 12 |
| 4 | District-Wise Disparities in Human Development in Maharashtra State | Dr. Umendra B. Sangolkar | 20 |
| 5 | Corporate Governance and its Implications | Dr. R. K. Shinde | 29 |
| 6 | Mall Culture in India : An Overview | Girish M. Mayee | 34 |
| 7 | मराठवाडयातील शहरीकरणाचा चिकित्सक अभ्यास | चंद्रशेखर जे. देशमुख<br>डॉ. रमेश पी. साळी | 40 |
| 8 | भारतातील काळा पैसा | डॉ. सतिश गव्हाणे | 46 |
| 9 | महिला सक्षमीकरण भारताच्या मानवी विकासातील गंभीर समस्या | डॉ.अशोक टिपरसे | 50 |
| 10 | शेतीआधारीत उद्योगाचे ग्रामीण विकासातील महत्व | डॉ. रावसाहेब पि. इंगळे | 56 |
| 11 | भारतीय बँकिंग क्षेत्र : एक अभ्यास | दिनेश भास्करराव खेर्डे | 61 |
| 12 | भारतीय अर्थव्यवस्था आणि लघू उद्योग | गोपाल तडस | 68 |
| 13 | दुष्काळाचे आव्हान पेलतांना महाराष्ट्र शासनाची भुमिका - एक दृष्टीक्षेप | डॉ. अशोक खाचणे | 72 |
| 14 | नांदेड जिल्ह्यातील तालुक्यानुसार पतपुरवठयाचा चिकित्सक अभ्यास | जी. जी. गायकवाड | 80 |
| 15 | केंद्रीय अर्थसंकल्प २०१७-२०१८ एक मूल्यमापन | डॉ. सुभाष प्रभू राठोड | 89 |
| 16 | शासकीय योजनांचा पारधी जमातीच्या विकासावरील परिणाम : एक अध्ययण | डॉ.संतोष उध्ववराव धामने | 98 |



282

ADARSH APARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

# महिला सक्षमीकरण भारताच्या मानवी विकासातील गंभीर समस्या

डॉ.अशोक टिपरसे
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि.नांदेड (महाराष्ट्र) भारत

## 9 RESEARCH PAPER - ECONOMICS

**गोषवारा**

*मानव विकासाची अमर्त्य सेन यांच्या क्षमतेच्या (Capability) संकल्पनेवर आधारलेली आहे. केवळ उत्पन्न वाढ म्हणजे विकास नव्हे, तर प्रत्येक राष्ट्रातील विकासामुळे त्या राष्ट्राच्या नागरिक स्त्री-पुरुषांना क्षमतेच्या वरच्या पातळीवर नेले पाहिजे. माणसांची क्षमता वाढविणारा विकास याला मानव विकास असे नांव देवून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) हा विकास मोजण्याचा निर्देशांक तयार केला, ज्या निर्देशांकात उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य यांचा समावेश केला जातो. मानव विकास निर्देशांक हा देशाचा सामाजिक व आर्थिक विकासाचा निकष मानला जातो. जागतिक मानव विकास निर्देशांक २०१५ नुसार १८८ देशात भारताचा १३० वा क्रमांक लागतो. ही बाब भारताला भूषणावह नाही, तसेच लिंगाधारित असमानता निर्देशांक २०१५ नुसार १८८ देशांत भारताचा १३० वा क्रमांक लागतो. यावरुन भारतात असणारी स्त्री-पुरुष असमानताच स्पष्ट होते.*

**प्रस्तावना :-**

सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमातर्फे (UNDP) पहिला मानव विकास अहवाल प्रसिध्द करण्यात आला. मेहबुब-उल-हक आणि अमर्त्य सेन त्यांचे प्रणेते होते. या अहवालात बाल कल्याण, महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण, उत्पन्न, आहार व पोषण, दारिद्र्य निर्मूलन तसेच रोजगाराच्या संधी वगैरे निर्देशकांच्या आधारावर मानवी विकासाचे मोजमाप केले

Issue : XII, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
Oct. 2016 To Mar. 2017 51

Adarsh Vyapari Education Society's Degloor College Degloor Dist.Nanded

आहे. त्या निर्देशांकाच्या आधारावर जागतिक पातळीवर प्रत्येक देशाला विशिष्ट क्रमांक दिला गेला व त्या क्रमांकावरुन संबंधीत देशाची मानवी विकासाची पातळी निश्चित करण्यात आली. प्रत्येक अहवालाचा एक विशिष्ट विषय असतो - उदा.दारिद्र्य, लिंगभाव, राजकीय हक्क इत्यादी.

संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमाच्या वर्ष २०१५ मधील अहवालानुसार, मानवी विकास निर्देशांकाबाबत २०१५ मध्ये एकुण १८८ देशांच्या यादीत भारत १३० व्या क्रमांकावर होता. त्यापुर्वीच्या वर्षात (२०१५) भारत १३५ व्या क्रमांकावर होता. भारताचे एचडीआय मूल्य. २०१५ मध्ये ०.६०९ झाले आहे. तसेच मानव विकासाच्या बाबतीत देश मध्यम श्रेणीत आला आहे. यानुसार, १९८० ते २०१५ दरम्यान भारताचे एचडीआय मुल्य ०.३६२ वरुन ०.६०९ वर पोचले आहे. म्हणजेच यात ६८.१ टक्के वाढ झाली आहे.

मानवी विकास निर्देशांक नॉर्वे आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. बांगलादेश व पाकिस्तान या यादीत १४२ व १४७ व्या क्रमांकावर आहेत. ब्रिक्स देशांमध्ये भारताचे स्थान सर्वात खालचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) मानव विकास निर्देशांक संकल्पना समजून घेणे.

२) लिंग विकास निर्देशांक तपासणे.

३) लिंग असमानता निर्देशांकात भारताची सद्य स्थिती तपासणे.

४) जागतिक लिंग असमानता स्थितीचा अभ्यास करणे.

**जागतिक स्तरावरील विकासाचे निर्देशांक :-**

जागतिक पातळीवर स्त्रीचा दर्जा अनेक वर्षापासून एक वादग्रस्त मुद्दा होता. स्त्रियांना कोणत्याच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग मिळत नाही हा एक बहुतेक देशात वादळी चर्चेला विषय होता. १९९५ च्या मानव विकास अहवालात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत विकासाची कितपत संधी मिळते याचे मापन करणारा लिंगाधारित विकास निर्देशांक (Gender-Related Development India-GDI) हा नवा मापक वापरात आला. त्यात स्त्री-पुरुष लोकसंख्येसाठी स्वतंत्रपणे वापरुन स्त्री-पुरुष संधीतील तफावत काढली जाते. तसेच स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत मिळणाऱ्या आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय जबाबदारीतील वाटा निर्णय स्वतंत्र्य कितपत मिळते त्याचे मापन करण्यासाठी लिंग सबलीकरण निर्देशांक हा तिसरा निर्देशांक देखील १९९५ पासून मानव विकास अहवालातून प्रसिध्द केला जातो. त्याचबरोबर विकासातील स्त्रियांच्या सहभागीता स्पष्ट करणारी काही आंतरराष्ट्रीय परिमाने देखील अलिकडच्या काळात उदयास येत आहेत, नंतरच्या प्रत्येक मानव विकास अहवालात एकेक नव्या आशयाचा पाठ पुरावा केला. त्यातच २०१० सालापासून लिंग विषमता निर्देशांक (Genderinequality Index - GII) नवा

2/12

स्त्री-पुरुषामधील विषमता मापक तयार करण्यात येत आहे तो विकसित करण्यात [illegible] (Beneria) पेर्मान्येर (Permanyer) आणि सेच (Seth) याची भुमिका महत्वाची आहे. जागतिक स्तरावरील संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने विविध निर्देशांकाची रचना केली आहे. त्या आधारे देशांची तुलना करणे शक्य झाले आहे. यु.एन.डी.पी.मार्फत दरवर्षी मानव विकास अहवाल (Human Development Report) जाहिर केला जातो. या अहवालात विविध देशांसाठी पुढील ५ प्रमुख निर्देशांकाची गणना केली जाते.

१) मानव विकास निर्देशांक

२) लिंग भावात्मक विकास निर्देशांक

३) असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक

४) लैंगिक (जेंडर) असमानता निर्देशांक

५) बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक

प्रस्तुत शोध निबंधात लैंगिक (जेंडर) असमानता निर्देशांकाबद्दल प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**लैंगिक असमानता निर्देशांक :-**

महिलाच्या विकासाचा स्तर परिगणित करण्यासाठी लिंगविषयक विकास सूचक वापरले जातात उदा. लैगिक जेंडर (Gender Ineaulity Index GII) असमानता निर्देशांक हा निर्देशांक २०१० च्या अहवालात लागू करण्यात आला त्याने १९९५ पासून लागू करण्यात आलेल्या लिंग आधारित विकास निर्देशांक (GDI) व लिंग सबलीकरण परिणाम (GEM) याची जागा घेतली आहे. त्याची गणना पुढील प्रमाणे करण्यात येते.

**जनन आरोग्य (Reproductive Helth):-**

ते मोजण्यासाठी पुढील निर्देशांक वारले जातात.

१) माता मर्त्यता (Maternal Mortality)

२) किशोरवयीन जन्यता (Adolescent Fertility)

**सबलीकरण (Empowerment) :-**

त्याचे प्रमाण मोजण्यासाठी पुढील निर्देशांक वापरले जातात.

१) संसदीय प्रतिनिधित्त्व (Parliamentry representations)

२) शैक्षणिक स्तर (Educational Attainment) माध्यमिक व वरील स्तरावरील

३) श्रम बाजार (Labour Market) त्याचे प्रमाणश्रम शक्तीतील सहभागावरुन मोजले जाते.

**स्त्रि-पुरुष समानतेमुळे मानव विकास निर्देशांकावरील परिणाम :-**

लिंग असमानता निर्देशांक (GII) इतर निर्देशांकापेक्षा भिन्न परिमाणाचा वापर करुन

Issue : XII, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2. 86
ISSN 2249-4081
Oct. 2016 To Mar. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

स्त्री-पुरुष विषमता निर्देशांक हा मानव विकास अहवालामधील एक महत्त्वाचा घटक होय प्रजनन सक्षमीकरण व आर्थिक कृतिशिलता या तीन बाबीतील विषमता विचारात घेऊन हा निर्देशांक बनवला जातो.

तक्ता क्र. ०१

| परिमाण | पुररुत्पादन संबधीचे आरोग्य | सक्षमीकरण | आर्थिक क्रिया |
|---|---|---|---|
| मूलक | माता मृत्युदर<br>पौगाडावस्थामधील<br>जन्मदर (१५-१८<br>वयोगटातील महिला) | महिलेचा संसदेतील सहभाग<br>माध्यमिक व अधिकचे शिक्षण | श्रम शक्तीचा<br>सहभागातील<br>दर |

वरील परिमाणाच्या आधारे या तीन क्षेत्रातील स्त्रियांच्या प्रतिकूलता प्रतिबिंबीत करते. या निर्देशांकाद्वारे या क्षेत्रातील स्त्री-पुरुष असमानतेमुळे मानव विकास निर्देशांकात होणारी हानी दर्शविली जाते. या निर्देशांकाचा विस्तार ० (शुन्य) ते १ (एक) यादरम्यान असतो. निर्देशांकाचे मूल्य शून्य (०) आल्यास त्याचा अर्थ आर्थिक विकासात न्याय स्त्री-पुरुष समानता आहे या उलट मूल्य एक (१) आल्यास त्याचा अर्थ उपरोक्त तीन क्षेत्राच्या संदर्भात प्रचंड विषमता आहे असा होतो. हा निर्देशांक सध्या १५५ देशाकरीता मोजण्यात येतो. भारताचा GII ०.५६३ इतका आहे. जर भारतातील महिलांचा वेगळा देश बनविला तर त्या देशाची मानव विकास निर्देशांकात क्रमवारी १५१ असेल एवढ्या मोठ्या प्रमाणात भारतातील स्त्रियांची स्थिती बिकट आहे लिंग असमानता तर भारताची स्थिती पुढील प्रमाणे.

216

Issue : XII, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 2.86
ISSN 2249-4081
Oct. 2016 To Mar. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

तक्ता क्र. 2

लिंग असमानता निर्देशांक (Gender Inequality Index - GII)

| देश | रँक | लिंग असमानता निर्देशांक | माता मृत्यु दर | पौंगडावस्था जन्म दर (1000 महिला मागे 15-18 वयोगट) | महिलांचा संसदे मधील सहभाग (x) | किमान माध्यमिक शिक्षण मिळालेली लोकसंख्या (25 आणि त्यापेक्षा जास्त%) | | काम शक्तीचा भागीदारी दर (25 आणि त्यापेक्षा जास्त%) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिला | पुरुष | महिला | पुरुष |
| स्लोव्हिनिया | 1 | 0.016 | 7 | 0.6 | 27.7 | 95.8 | 98.0 | 52.3 | 63.2 |
| स्विर्त्झलँड | 2 | 0.28 | 6 | 1.9 | 28.5 | 95.0 | 96.6 | 61.8 | 74.9 |
| जर्मनी | 3 | 0.041 | 7 | 3.8 | 36.9 | 96.3 | 97.0 | 53.6 | 66.4 |
| ऑस्ट्रेलिया | 19 | 0.110 | 6 | 12.1 | 30.8 | 94.3 | 94.6 | 58.8 | 71.8 |
| नॉर्वे | 9 | 0.067 | 4 | 7.8 | 39.6 | 97.4 | 96.7 | 61.2 | 68.7 |
| डेन्मार्क | 4 | 0.048 | 5 | 5.1 | 38.0 | 95.9 | 96.6 | 58.7 | 66.4 |
| ब्राझील | 97 | 0.457 | 69 | 70.8 | 9.6 | 54.6 | 52.4 | 59.4 | 80.8 |
| श्रीलंका | 72 | 0.370 | 29 | 16.9 | 5.8 | 72.7 | 76.4 | 35.1 | 76.3 |
| साउथ अफ्रिका | 83 | 0.407 | 140 | 50.9 | 40.7 | 72.7 | 75.9 | 44.5 | 80.5 |
| भारत | 130 | 0.563 | 190 | 32.8 | 12.2 | 27.0 | 56.6 | 27.0 | 79.9 |
| बांग्लादेश | 111 | 0.503 | 170 | 80.6 | 20.0 | 34.1 | 41.3 | 57.4 | 84.1 |
| नेपाळ | 108 | 0.489 | 190 | 73.7 | 29.5 | 17.7 | 38.2 | 79.9 | 87.1 |
| पाकिस्तान | 121 | 0.536 | 170 | 27.3 | 19.7 | 19.3 | 46.1 | 24.6 | 82.3 |
| चीन | 40 | 0.191 | 32 | 8.6 | 23.6 | 58.7 | 71.9 | 83.9 | 78.3 |
| येमेन | 155 | 0.744 | 270 | 47.0 | 0.7 | 8.6 | 26.7 | ·25.4 | 72.2 |
| जग | | 0.449 | 210 | 47.4 | 21.8 | 54.5 | 85.4 | 50.3 | 76.7 |

संदर्भ : UNDP HD Report 2015

भारतातील फक्त २७% स्त्रिया आर्थिकदृष्ट्या कार्यरत असून पुरुषामध्ये हेच प्रमाण ८०% इतके आहे. २०१५ मध्ये भारत असमाधानकारकपणे १५५ देशापैकी १३० व्या क्रमांकावर होता. जे की पाकिस्तान आणि बांग्लादेश पेक्षा बऱ्याच मागे म्हणजे अनुक्रमे १११ व्या आणि १२१ व्या क्रमांकावर आहेत. अहवालानुसार संसदेच्या एकूण जागापैकी १२.२ टक्के जागामध्ये महिला आहेत हे लक्षात येते. तुलना प्रमाणात बांग्लादेशचे २० टक्के आणि पाकिस्तानचे १९.७% आहे. याशिवाय प्रौढ महिला केवळ २७ टक्के किमान माध्यमिक पातळीवर शिक्षण प्राप्त केली आहेत. जरी हे प्रमाण पाकिस्तान (१९.३%) पेक्षा जास्त आहे तरी ते बांग्लादेश (३४%) पेक्षा कमी भारतामध्ये असमाधानकारकपणे माता मृत्युदर (MMR) किंवा मृत्यू प्रति १००,००० जीवन जन्म आहे. भारताचा १९० तुलनेत पाकिस्तान आणि बांग्लादेश या दोन्ही चा MMR १७० वर कमी आहे या अहवालवरुन असे स्पष्ट होते की, स्लोव्हिनिया, स्विर्त्झलँड आणि जर्मनी या देशानी लिंग समानतेच्या बाबतीत अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय स्थान पटकावले असून त्यांचे जी.आय.आय. हे अनुक्रमे ०.०१६, ०.०२८ आणि ०.०४१ इतके आहेत. या संदर्भात तळाला येमेन आहे. त्याचा जी.आय.आय. ०.७४४ इतका आहे जी आय.आय.ची जागतिक सरासरी ०.४४९ इतकी आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत संशोधन लेखावरुन पुढील प्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

१. भारतामध्ये स्त्री-पुरुष असमानता निर्माण झाल्यामुळे त्याचे सामाजिक, आर्थिक, मानवी व सांस्कृतिक विकासावर दुष्परिणाम होत आहे.

२. लिंग विषमता या आघाड्यावर भारत शेजारी राष्ट्राच्या तुलनेत देखील पिछाडीवर आहे.

३. पुरुषांच्या तुलनेत शिक्षण मिळण्याबाबत होणारा दुजाभाव या भारताच्या मानवी विकासातील प्रमुख समस्या आहेत.

४. लिंग भाव असमानता ही भारतापुढे यक्षप्रश्न बनून उभी आहे. विकसनशिल देशामध्ये लिंगभाव असमानतेची सगळ्यात गंभीर परिस्थीती भारतात आहे.

५. स्त्रीभ्रूण हत्या होय, बालविवाहामुळे कुमारवस्थेतली प्रसूती दर आणि मात मृत्यू दर जास्त प्रमाण स्त्रियाच्या जास्त सहभाग भारतीय संसदेत महिला खासदारांचे प्रमाण कमी आहे.

## संदर्भ सूची :-

१. Boserup, Esther (१९७०) Womens Role in Economic Development New York: St.Martins Press.

२. National Human Development Report २०११ / Planning Commission, Government of India New Delhi.

३. UNDP (United Nations Development Programme) Human Development Report २०१५ New York and Oxford University Press.

४. Maharashtra Human Development Report २०१२ Towards Inclusive Human Devlopment Yashwantrao Chavan Academy of Development Administration Pune.

५. Governemnt of Maharashtra (२०१५-१६) Economic Survey of Mahrashtra Deirectorate of Statisticsand Ecomonics

६. जाधव तुकाराम, महाराष्ट्र वार्षिक, २०१५ बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी पुणे.

७. डॉ.अशोक टिपरसे (२०१३) मानवी विकासातील लिंग समानतेची भूमिका Male--Fefale Ratio Imbalance in india, Y.C.M.College Ambajogai

८. Dr.Ashok Tiparse (२०१६) Empowerment of Women and Empowerment of Nation, Women National Conference Empowerment, S.M.Shirur Anantpal, Latur .

218

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded